## जाहीर अवाहन

**योजना-१)वैरण विकास कार्यक्रम योजनेचे स्वरुपः**-वैरण विकास कार्यक्रमामध्ये१)बहुवर्षिक पिकाची लागवड-१ एकर क्षेत्रावर १०० टक्के अनुदानावर बहुवार्षिक चारा पिके लागवड यामध्ये रु ४८००/चे बीयाणे/ठोंबे रु ४८००/- लागवड/मशागत रु २४००/इतर खर्च एकुण रु १२०००/-प्रति लाभार्थी अनुदान देय आहे.बहुवर्षिक बीयाणे/ठेंबे शासकिय प्रक्षेत्र, पशुधन विकास मंडळ,मेढी व शेळी विकास महामंडळ कृषि विद्यापीठ यांचेकडुन लाभार्थीनी खरेदी करावयाचे आहे.वरील बाब प्रकल्प क्षेत्रातील ज्या गावातुन यापर्वी अर्ज प्राप्त झालेले नाहीत अशा गावामध्ये राबविण्यात येणार आहे.

**२)वैरण विकास कार्यक्रम** यामध्ये वैरण विकास प्रशिक्षणाचा समावेश असून पशुपालकांना १ दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.सदर प्रशिक्षणामध्ये वैरण उत्पादनाचे महत्व, दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन, अनुवंशीक सुधारण,पशु आहार ,रोग नियंत्रण,उत्पादन वाढीचे कौशल्य व्यवसयिकता या विषयी महिती देण्यात येणार आहे. सदरची योजना यापूर्वी ज्या गावातील लाभार्थि कडुन अर्ज प्राप्त झालेले नाहीत अशा गावामध्ये राबविण्यात येणार आहे.

**३)गुणवत्तापूर्व पशुखाद्य पुरवठा** ( cattle feed ) यामध्ये प्रति जनावर ३ कि.गॅ/प्रतिदिन या प्रमाणे १८० दिवस असे एकुण ५४० कि.ग्रॅ पशुखाद्य एका दुधाळ जनावरासाठी प्रति पशुपालक २गाय/म्हैस या मर्यादेत पशुखाद्य २५टक्के अनुदानावर देय राहील.अनुदानाची अधिकत्तम मर्यादा प्रति किलो रु ६.०० या प्रमाणे रु १८/- प्रतिदिन प्रति जनावर राहणार आहे.

पशुखाद्य प्रथम पशुपालकांनी खरेदी करावयाचे असून सक्षम प्रधिका-यांने पडताळणी केल्या नंतर अनुदान रक्कम थेट लाभार्थीच्या बॅक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

**४) पशुखद्य पुरके** –(Mineral mixture) यामध्ये प्रति जनावर २.५ कि.ग्रॅ/प्रति /प्रतिमहिना या प्रमाणे १२ महिन्यासाठु एकुण-३०कि ग्रॅ. पशुखाद्य पुरके प्रति पशुपालक २गाय /म्हैस या मर्यादेत ISIमार्क Mineral mixture २५ टक्के अनुदानावर देय आहे.अनुदानाची अधिकत्तम मर्यादा रु ३७५/- प्रति जनावरआहे.

पशुखाद्य व पशुखाद्य पुरके याचा लाभ मदर डेअरी दुध संकलनात सहभागी झालेल्या पशुपालकांना दयावयाचा आहे.

**५)मुरघास युनिट वाटप-** वैरणी ची साठवणुक करणेसाठी ५०० कि. ग्रॅ क्षमतेचे १० सायलेज बॅग ६० टक्के अनुदानावर देय आहे अनुदानाची अधिकत मर्यादा रु ३६००/- आहे.

**६) विद्युत चलित कडबाकुट्टी यंत्राचा पुरवठा –** ५० टक्के अनुदानावार २ एचपी विद्युत चलित कडबाकुट्टी यंत्राचा पुरवठा करणे या मध्ये अनुदान मर्यादा रु ८०००/- प्रति लाभार्थी आहे

मुरघास युनिट व विद्युतचलीत कडबाकुट्टी यंत्र या योजनेचा लाभ ज्या लाभार्थीनी बहुवार्षीक वैरण पिकाची लागवड या बाबीखाली लाभ घेतलेला आहे त्याना प्राधान्याने लाभ द्यावयाचा आहे .जर या पुर्वी लभार्थीनी मुरघास अथवा विद्युतचलित कडबाकुट्टी यंत्र याचा लाभ घेतला असेल तर त्या त्याचा लाभ घेता येणार नाही .

लाभधारक निवडीचे अधिकार मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे अध्यक्षेतेखालील समितीस आहेत.

ज्या गावातून अर्ज मागवावयाचे आहेत अशा गावाची यादी पशुधन विकास अधिकारी (वि) संबधीत तालुका यांच्या कडे पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

सदरच्या योजनेचे अर्ज दि.०४/०१/२०१९ ते २४/०१/२०१९ या कालावधीत नजीकच्या पशुवैद्यकिय संस्थेत स्विकारण्यात येतील.अर्जाचा नमुना पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिति व संबधीत पशुवैद्यकिय संस्था यांच्या कडे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर योजनेमध्ये लाभार्थी निवड झाल्यानंतर व लाभधारकाला कार्य आदेश दिल्यापासून लाभार्थीनी १ महिन्याच्या आत वरील बाबी खरेदी करावे व तसा प्रस्ताव संबधीत दवाखान्यात देण्यात यावा.सक्षम प्रधिका-याकडून पडताळणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर बाबीचे अनुदान DBT द्वारे लाभार्थीच्या बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
उस्मानाबाद